# रॉबिन्सन क्रूसो

**डॅनियल डिफो**

अनुवाद

**उज्ज्वला करमळकर**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**रॉबिन्सन क्रूसो : डॅनियल डिफो**
अनुवाद : उज्ज्वला करमळकर

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
उज्ज्वला करमळकर
७१८ ई, दुर्गाकृपा, शाहूपुरी,
३ री गल्ली, कोल्हापूर- ४१६ ००१

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २१०/-

# रॉबिन्सन क्रूसो

**रॉबिन्सन** क्रूसो हा यार्क शहराचा रहिवासी होता. अगदी लहानपणापासून त्याला जहाजात बसून देश-विदेशाची सफर करण्याची मनापासून इच्छा होती; पण त्याच्या वडिलांना मात्र त्यानं नामांकित वकील व्हावं असं वाटत होतं. रॉबिन्सनचा भाऊ घर सोडून परदेशात गेला होता आणि त्यानंतर युध्दामध्ये त्याला आपले प्राण गमवावे लागले होते. साहजिकच त्याच्या भावाप्रमाणेच रॉबिन्सनलाही आपण गमावणार तर नाही ना, अशी भीती वडिलांच्या मनाला सतावत असे.

रॉबिन्सनचे वडील त्याला ही गोष्ट समजावून सांगत आणि रॉबिन्सन त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन कामात मग्न होत असे; पण जहाजातून प्रवास करण्याविषयीचं त्याच्या मनातील कुतूहल कायमच होतं. रॉबिन्सन जेव्हा या गोष्टीमुळं अस्वस्थ होत असे, तेव्हा तो आपल्या आईकडं जात असे आणि तिनं वडिलांना समजवावं यासाठी तिच्याजवळ हट्ट करत असे; पण वडिलांप्रमाणेच आईलाही त्यानं घर सोडून जाऊ नये असंच वाटत होतं. त्यामुळे त्यानं आपला हा हट्ट सोडावा, असं तिचं म्हणणं होतं. रॉबिन्सन मात्र हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपलं सर्वस्व द्यायलाही तयार होता.

अखेर तो दिवस उजाडला. आता रॉबिन्सनचं स्वप्न साकार होणार होतं. काही दिवसाळनंतर आपल्या मित्राला निरोप देण्यासाठी त्याला बंदरावर जावं लागलं. आश्चर्य म्हणजे वडिलांनी त्याला या गोष्टीसाठी परवानगीही दिली. या गोष्टीमुळे तो खूपच खूश झाला. त्याच्या मनात विचारचक्र सुरू झालं. 'खरंच, कसा असेल बरं हा सागरप्रवास...चारी बाजूला मोकळं आकाश...लांबवर उठणारे पक्ष्यांचे थवे... अंगाला झोंबणारा थंडगार वारा... या विचारांनी त्याच्या मनात एक अनामिक रोमांचकारक हुरहूर सुरू झाली.

आज त्याच्या आनंदाला पारावार राहिला नव्हता. पहाटेच उठून त्यानं स्नान केलं आणि तो ताजातवाना झाला. एकीकडं त्याच्या मनाला आनंदाचं उधाण

आलं होतं, तर दुसरीकडं आपल्या कुटुंबापासून दूर जाण्याच्या विचारानं तो अस्वस्थ झाला होता. अशातच स्वतःच्या भावनांना आवर घालून प्रवासाला जाण्यासाठी त्यानं मन खंबीर केलं.

रॉबिन्सननं जहाज, बंदर आणि समुद्र याविषयीचं वर्णन तर खूप ऐकलं होतं; पण प्रथमच स्वतःच्या डोळ्यांनी प्रत्यक्ष समुद्र बघण्याची संधी त्याला मिळाली होती. ज्यावेळी तो मित्राला निरोप देण्यासाठी गेला, तेव्हा तो स्वतःला आवरू शकला नाही आणि आई-वडिलांना काहीही न सांगता तो आपल्या मित्रासोबत जहाजात जाऊन बसला.

जहाज चालू लागलं.

रॉबिन्सनसाठी हा खूप आनंदाचा दिवस होता. त्याच्या मनातलं सागरप्रवासाचं स्वप्न आता पूर्ण होणार होतं. काही वेळासाठी त्याला जहाजावर खूप छान वाटलं. चारी बाजूला पाणीच पाणी होतं. जहाज हळूहळू पुढं पुढं जात होतं; पण समुद्रात थोड्या दूरवर गेल्यानंतर सोसाट्याचा वारा सुटला. उंच उंच लाटा दिसू लागल्या. ते दृश्य बघून रॉबिन्सनला भीती वाटू लागली. त्याला अस्वस्थ, कसंतरी वाटू लागलं. त्याच्या मनात विचार आला, 'कसंही करून एकदा मी किनाऱ्यावर पोहोचलो, तर सरळ घरी परत जाईन आणि पुन्हा कधी घर सोडण्याचा विचारही करणार नाही.'

जोपर्यंत वाऱ्याचा वेग कमी होत नव्हता, त्याला खूप अस्वस्थ वाटत होतं. घराची आठवण त्याला अस्वस्थ करत होती. त्याचा मित्र आणि जहाजावरचे इतर लोक त्याची चेष्टा करू लागले. त्याच्याकडे बघून हसू लागले. त्याची ती अवस्था पाहून एक-दोघं असंही म्हणाले की, 'हा तर अजून लहानच आहे. म्हणून याला घराची आठवण येते आहे.' पण जेव्हा हवामान चांगलं झालं आणि वादळ शांत झालं, तेव्हा तो आपल्या आई-वडिलांकडे परत जाण्याची गोष्ट विसरून गेला. आता तो पुन्हा आनंदी, उत्साही झाला होता.

वाऱ्याची दिशा योग्य नसल्यानं जहाजाला वाटेत एका ठिकाणी मारमाऊथच्या बंदरावर थांबावं लागलं. ज्या काळात इंजिनद्वारे चालणाऱ्या जहाजाचा शोध लागला नव्हता, त्या काळात जहाजचालक आणि काठ्यांच्या साहाय्यानेच ते चालवलं जात असे. त्यामुळं खराब हवामान आणि वाऱ्याची दिशा योग्य नसेल,

तर जहाजाला वाटेत थांबावं लागत असे. तसेच योग्य दिशेला वारा वाहण्याची वाट पाहावी लागत असे.

त्याचं जहाज मारमाऊथच्या बंदराजवळ उभं होतं, त्यादरम्यान एक दिवस अचानक खूप मोठं वादळ सुरू झालं. समुद्रामध्ये उंच उंच लाटा दिसू लागल्या आणि कप्तानानं धोका ओळखून प्रसंगावधान राखत जहाज उलटू नये यासाठी जहाजाच्या डोलकाठ्या खाली पाडल्या. अशा वेळी वादळी वाऱ्यामुळे डोलकाठ्यांना बांधलेल्या शिडामध्ये हवा जाऊन जहाज उलटू शकतं किंवा चुकीच्या दिशेला भरकटू शकतं. नंतर त्याने त्यांना मदतीची गरज आहे, हे कळावं तसंच किनाऱ्यावरील माणसांना जहाज संकटात आहे, हे लगेच लक्षात यावं यासाठी जवळच्या बंदुकीतून काही गोळ्याही हवेत उडवल्या.

थोड्याच वेळात लांब उभ्या असलेल्या एका जहाजातून एक होडी त्यांच्या मदतीसाठी आली. मोठ्या मुश्किलीनं कशीबशी ती जहाजापर्यंत पोहोचू शकली. जहाजातील सर्व प्रवासी तसंच कर्मचारी जीव वाचवण्यासाठी कसेतरी त्या होडीत बसले. रॉबिन्सनही त्यांच्याबरोबर होता. जेव्हा त्यांची होडी किनाऱ्यावर पोहोचत होती, त्याच वेळी त्यांचं जहाज वादळाच्या तडाख्यामुळं उलटं झालं होतं आणि समुद्रामध्ये बुडू लागलं होतं. ते दृश्य सर्वजण भेदरलेल्या नजरेनं पाहत होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर भीती दिसत होती. काळ आला होता; पण वेळ आली नव्हती हेच खरं! त्यांचा जीव वाचवल्याबद्दल त्या सर्वांनी परमेश्वराचे मनोमन आभार मानले. खूप प्रयत्नांनी ते सर्वजण किनाऱ्यावर पोहोचले.

ते सगळेजण अतिशय घाबरलेले होते आणि संपूर्णपणे भिजलेलेही होते. त्या सगळ्यांचे कपडेलत्ते आणि इतर सामान जहाजाबरोबरच पाण्यात बुडून गेलं होतं; पण रॉबिन्सनच्या खिशात थोडे पैसे होते. त्यामुळे तो रस्त्याच्या मार्गाने लंडनला निघून गेला. आता पुन्हा घरी परत जाणं त्याला योग्य वाटत नव्हतं. तो घरी गेला, तर लोक त्याला हसतील आणि घरी गेल्यावर घरचे त्याला रागावतील, ओरडतील अशी भीतीही त्याला वाटत होती.

लंडनला गेल्यावर तिथल्या एका जहाजाचा कप्तान असलेल्या माणसाशी रॉबिन्सनची मैत्री झाली. तो काही दिवसांपूर्वीच आफ्रिकेच्या सहलीवरून परतला होता. आफ्रिकेमध्ये त्या कप्तानाने भरपूर पैसे कमावले असल्याचं त्यानं रॉबिन्सनला

सांगितलं. त्यामुळे दुसऱ्या सहलीसाठी त्यानं रॉबिन्सनला आपल्याबरोबर येण्यासाठी सुचवले असता, तो तिथं जाण्यासाठी सहज तयार झाला.

या नव्या मित्राच्या, कप्तानाच्या बोलण्याचा रॉबिन्सनला विश्वास वाटत होता. रॉबिन्सनने विचार केला, 'चला, आफ्रिकेला जाण्याची संधी तरी मिळाली. शक्य झालं तर आपणही एखादा व्यवसाय करून थोडे पैसे जमा करू. आपलं नशीब आजमावून बघू.' त्यानं कप्तानाच्या सल्ल्यानं आफ्रिकेतील आदिवासींना विकण्यासाठी काही खेळणी आणि काचेच्या मोत्यांच्या माळा बरोबर घेतल्या. नियोजित वेळेनुसार जहाज प्रवासासाठी सज्ज झालं. त्यांचा प्रवास खूप चांगला झाला. रॉबिन्सनने आफ्रिकेच्या आदिवासींना बरोबर आणलेल्या मोत्यांच्या माळा आणि खेळणी विकली. त्याची त्याला चांगली किंमतही मिळाली. ते आदिवासी लोक त्याच्या वस्तूंच्या बदल्यात सोनं देत होते. अशा प्रकारे रॉबिन्सनजवळ थोडे पैसे जमा झाले.

रॉबिन्सन विचार करत होता की, अशा प्रकारे मी काहीच दिवसांत श्रीमंत होईन. या मोहापायी त्यानं दुसऱ्या वेळी पुन्हा आफ्रिकेची सहल करण्याचा निश्चय केला; पण या वेळची सहल मोठी दुर्दैवी ठरली. काही वेळानंतर रॉबिन्सनच्या जहाजावरील लोकांना कळलं की, समुद्रात दिसणारं दुसरं जहाज समुद्री डाकूंचं आहे.

ते जहाज खूप वेगानं पुढं येत होतं.

संध्याकाळपर्यंत ते जहाज या जहाजाजवळ येऊन पोहोचलं. रॉबिन्सनच्या जहाजामध्ये इतकी जास्त माणसंही नव्हती आणि त्यांच्याजवळ तशा बंदुकाही नव्हत्या, जितक्या त्या डाकूंजवळ होत्या. साहजिकच त्यांच्यातली लढाई खूप लवकर संपली आणि ते डाकूही त्या जहाजावर चढले. त्यांनी त्याचं जहाज लुटलं आणि जी माणसं लढाईमध्ये वाचली होती, त्यांना त्यांनी गुलाम बनवलं. इतरांप्रमाणेच रॉबिन्सनलाही ते पकडून आपल्याबरोबर घेऊन गेले.

त्या डाकूंच्या सरदारानं रॉबिन्सनला आपला खासगीतला गुलाम बनवलं. त्याला तो आपल्या घरी घेऊन गेला आणि त्याच्याकडून घरातली कामं करून घेऊ लागला. त्यानं रॉबिन्सनला बागेमध्ये माळी म्हणून काम करायला सांगितलं. जेव्हा त्याचं जहाज बंदरावर येत असे, तेव्हा तो रॉबिन्सनला जहाजाची स्वच्छता

करण्यासाठी पाठवत असे; पण तो कधीही त्याला आपल्याबरोबर प्रवासाला घेऊन जात नव्हता. अशा प्रकारे दोन वर्षं निघून गेली. रॉबिन्सन खूप दुःखी झाला असल्यानं तो उदास उदास राहत असे. त्याचा दिवस जाता जात नसे. स्वतःचं मन मारून त्याला त्या डाकूंची सेवा करावी लागत असे; पण अशा परिस्थितीतही त्याच्या मनात एक आशा जागी होती, ती म्हणजे कधी ना कधीतरी मला इथून पळून जाण्याची संधी नक्कीच मिळेल.

डाकूंचा सरदार आता त्याला अधून मधून आपल्याबरोबर मासे मारण्यासाठी नेऊ लागला होता. रॉबिन्सन मासे पकडण्यात चांगला तरबेज होता. तो सरदार त्याला नेहमी 'जूरी'नावाच्या आफ्रिकी मुलाबरोबर मासे मारण्यासाठी पाठवत असे, जूरी रंगाने अगदी काळाकुट्ट होता. तो आफ्रिकेचा एक निग्रो मुलगा होता, ज्याला डाकूंच्या सरदाराने आपला गुलाम बनवलं होतं.

एक दिवस डाकूंच्या सरदाराने रॉबिन्सनला हुकूम दिला की, 'मासे पकडायला जायचं आहे, तयारीला लागा.' एका इंग्रजी जहाजातून चोरलेल्या एका मोठ्या होडीमध्ये खाण्यापिण्याच्या वस्तू, बंदुका, गोळ्या आणि दारूगोळा वगैरे सामान ठेवलं गेलं. त्या दिवशी सरदाराचे काही मित्रही त्याच्याबरोबर मासेमारीसाठी जाणार होते; पण काही कारणानं ते मित्र वेळेवर येऊ न शकल्यानं त्यानं रॉबिन्सन आणि जूरीला एका दुसऱ्या नोकराबरोबर मासे पकडून आणण्यासाठी पाठवले.

ते सगळे त्या होडीतून जाण्याची तयारी करू लागले. रॉबिन्सनच्या मनात विचार आला, या गुलामगिरीच्या आयुष्यातून स्वतःला मुक्त करण्याची यापेक्षा चांगली संधी पुन्हा मिळणार नाही.

त्यानं आपल्याबरोबर असलेल्या नोकराला समजावलं, ''होडीमध्ये आणखी थोडं खाण्याचं सामान आणि पाणी ठेव, कारण खाण्याच्या ज्या दुसऱ्या वस्तू आहेत त्या मालकांनी त्यांच्या मित्रांना मेजवानी देण्यासाठी मागवल्या होत्या. त्या आपण कशा खाऊ शकतो! बरं, थोडासा दारूगोळाही आणखी घेऊन ये. आपण माशांबरोबर काही पक्षीही मारून आणूया.''

नोकर रॉबिन्सनने सांगितल्याप्रमाणे सगळ्या वस्तू घेऊन आला.

किनाऱ्यापासून जवळपास एक मैल अंतरावर गेल्यावर त्यांनी आपली होडी थांबवली आणि मासे पकडायला सुरुवात केली. थोड्या वेळानंतर रॉबिन्सन

म्हणाला, ''चला, थोडं आणखी पुढं जाऊ या, इथं तर मासेच दिसत नाहीयेत. एवढ्या वेळात आपल्याला एकही मासा मिळालेला नाही.''

अशा प्रकारे त्यांनी होडी आणखी पुढे नेली. जेव्हा किनारा होडीपासून खूप मागे राहिला, तेव्हा एके ठिकाणी होडी थांबवून ते तिघेजण मासे पकडायला लागले.

रॉबिन्सन त्या नोकरावर नीट लक्ष ठेवून बसला होता. संधी मिळताच त्यानं त्या नोकराला एक जोराचा धक्का दिला. तो नोकर सपकन पाण्यात जाऊन पडला. रॉबिन्सननं जूरीला बरोबर घेऊन होडी लगेच पुढं नेली. त्या नोकराला थोडंफार पोहायला येत होतं. तो रॉबिन्सनला शिव्या देत किनाऱ्याकडे निघून गेला. रॉबिन्सन आणि जूरी होडी चालवत दक्षिणेकडे पुढं जाऊ लागले.

रॉबिन्सनला माहीत नव्हतं की, होडी आता कुठल्या देशाच्या दिशेनं जात आहे; पण आपण डाकूंपासून मुक्त झालो आहोत, या गोष्टीचा त्याला सगळ्यात जास्त आनंद होत होता. आता त्याला कसलीच भीती वाटत नव्हती. होडी पुढे जात होती. एक एक दिवस पुढं सरकत होता. रात्रीच्या वेळी तो होडी किनाऱ्यावर नेत असे; पण किनाऱ्यावर उतरण्याची हिंमत त्याच्यामध्ये नव्हती. त्याला भीती वाटत होती की, कुठे जंगली जनावर किंवा आदिवासी त्याच्यावर हल्ला तर करणार नाहीत? आणि पुन्हा एकदा समुद्री डाकूंच्या तावडीत सापडण्याचा धोकाही होता. अनेकदा त्याला किनाऱ्यावर वाघाच्या डरकाळीचा आवाजही ऐकू आला होता.

एकदा रॉबिन्सनने पाहिलं की, एक वाघ समुद्रकिनाऱ्यावर खडकावर झोपलेला आहे. ते दृश्य पाहून त्याच्या अंगाचा थरकाप झाला; पण धीर करून त्यानं आणि जूरीनं बंदुकीचा नेम धरून त्याला गोळी घातली. वाघ जागच्या जागीच मरून पडला. नंतर ते किनाऱ्यावर गेले आणि मेलेल्या वाघाला उचलून घेऊन आले. त्यांनी त्याची कातडी सोलून एक चांगलं आसन बनवलं, ज्याच्यावर रॉबिन्सन रात्रीच्या वेळी झोपत असे.

अशा प्रकारे होडीमध्ये त्यांचे अनेक आठवडे निघून गेले. एक दिवस त्यांना रस्त्यामध्ये एक मोठं पोर्तुगीज जहाज दिसलं. जहाजवाल्या लोकांनी त्यांना आपल्या जहाजात चढवलं. रॉबिन्सननं होडी, बंदूक आणि आपल्याकडचं इतर